निशाणी क्र.१३

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – आनंद भाऊसाहेब चव्हाण,

वय – ४६ वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे यांचे मार्फत सुरू–**

१. दिनांक २२.०१.२०२१ रोजी पोलीसांनी मला पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २२.०१.२०२१ रोजी पोलीसांनी मला नेवासा ते कुकाणा रस्त्यावर भानसहिवराकडे जाणा–या रस्त्यावर अपघात झाला होता तेथे पंचनामा करण्याकरिता बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे दुचाकी क्रमांक एम.एच.१७ सी.एन. २०३३ या गाडीने एका इसमास उडवले होते. त्याचा माझ्या समक्ष पोलीसांनी पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत बाबासाहेब वडागळे हा होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला, तो मला वाचून दाखवल्यानंतर मी त्यावर सही केली. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होवू नये याकरिता आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. बी. जी. झावरे यांनी नाकारला.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**
**(संध्या यु. सुळ)**

दिनांक–१६/०९/२०२५.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा